**<u>ठळक बातम्या</u>**

- आदिवासी समाजाचा वारसा आणि संस्कृती जपण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची ग्वाही

- जातनिहाय जनगणनेबाबत भूमिका स्पष्ट करण्याचं काँग्रेसचं भाजपाला आव्हान, सत्तेत आल्यावर काँग्रेस आरक्षण हटवणार असल्याचा प्रधानमंत्र्यांचा आरोप फेटाळला

- श्रीलंकेच्या संसदीय निवडणुकीत राष्ट्रपती दिसा नायके यांच्या नॅशनल पीपल्स पॉवर पक्षाला स्पष्ट बहुमत

**आणि**

- भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात आज टी ट्वेन्टी क्रिकेट मालिकेतला चौथा सामना

**<><><><><>**

आपलं सरकार आदिवासी समाजाचा वारसा आणि संस्कृती जपण्यासाठी वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. जमुई इथल्या जाहीरसभेला ते संबोधित करत होते. धरती आबा जनजाती ग्रामउत्कर्ष अभियानांतर्गत आदिवासी गावांच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ८० हजार कोटी रुपये खर्च केले जातील, अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली.

आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये बिरसा मुंडा गौरव उपवन सुरू करण्याची घोषणा केली. तसंच, इतर विकासकामांची घोषणा केली. यावेळी ते म्हणाले…

**होल्ड - बाईट -प्रधानमंत्री**

भगवान बिरसा मुंडा यांच्या दीडशेव्या जयंती वर्षाचा प्रारंभ करताना बिरसा मुंडा यांच्या जीवनावर आणि समृद्ध आदिवासी वारसा तसंच संस्कृतीवर आधारित प्रदर्शनाचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांनी केलं. यासोबत त्यांनी दोन आदिवासी स्वातंत्र्य सैनिक संग्रहालयं तसंच दोन आदिवासी संशोधन संस्थांचंही उद्घाटन केलं.

**<><><><>**

बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीचं औचित्य साधून, नवी दिल्लीत बानसेरा पार्क इथं उभारलेल्या बिरसा मुंडा यांच्या पुतळ्याचं अनावरण केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. या निमित्तानं सराई कालेखान चौकाचं नामांतर भगवान बिरसा मुंडा चौक करायचा निर्णय सरकारनं घेतला असल्याचं अमित शहा यांनी यावेळी सांगितलं.

केंद्रीय गृहनिर्माण मंत्री मनोहरलाल दिल्लीचे नायब राज्यपाल विनयकुमार सक्सेना आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><>**

जातनिहाय जनगणनेबाबत भाजपा आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोंदी यांनी त्यांची भूमिका जाहीर करावी, असं आव्हान काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी दिलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बाेलत होते. काँग्रेस अनुसूचित जाती- जमातींचं आरक्षण  संपवणार असल्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा आरोप त्यांनी फेटाळून लावला. जातनिहाय जनगणनेला भाजपाचा विरोध आहे, त्यामुळेच प्रधानमंत्री आरक्षण संपवण्याचा खोटा आरोप काँग्रेसवर करत आहेत, असं ते म्हणाले.

**<><><><>**

राज्यातलं महायुतीचं सरकार गरजू जनतेला समर्पित आहे, ते पुन्हा सत्तेत आणा, असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. ते आज हिंगोली इथं आयोजित प्रचार सभेत बोलत होते.

काश्मीरमधे ३७० कलम पुन्हा लागू करण्याचं आश्वासन काँग्रेस देत आहे, पण त्यांना हे कदापी शक्य होणार नाही, अशी टीका शहा यांनी केली. उद्धव ठाकरे यांच्यावरही त्यांनी टीका केली.

महायुती सरकार राज्याचा गौरव पुन्हा आणून देईल, असं आश्वासन त्यांनी चंद्रपूरमधल्या सभेत दिलं.

**होल्ड - अमित शहा बाइट**

**<><><><>**

राज्यात एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारनं उत्तम काम केलं असून विरोधक महाराष्ट्राला पिछाडीवर नेण्याचं काम करत असल्याची टीका भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी आज केलं. ठाण्यात आज झालेल्या प्रचारसभेत ते बोलत होते. भाजपा सबका साथ, सबका विकास करताना देशातल्या गरीब घटकाची प्रगती करणार असल्याचं आश्वासन नड्डा यांनी या सभेत दिलं.

**<><><><>**

सोयाबीन खरेदी करताना किमान आधारभूत किंमतीतली तफावत दूर करण्यासाठी भावांतर योजना लागू करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिलं. नांदेडमधल्या प्रचारसभेत ते बोलत होते. सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नसल्याची ग्वाही त्यांनी दिली.

दरम्यान, कांद्याची बेकायदा साठवणूक करणाऱ्या कांदा व्यापाऱ्यांवर संबंधित अधिनियमांनुसार कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी अन्न आणि नागरी पुरवठा तसंच पणन विभागाला दिले आहेत.

**<><><><><>**

श्रीलंकेत नॅशनल पीपल्स पॉवर या पक्षानं संसदीय निवडणुकांमध्ये पुन्हा बहुमताचा आकडा पार केला आहे. संसदेतल्या २२५ पैकी १५९ जागा या डाव्या आघाडीला मिळाल्या आहेत. त्यामुळं राष्ट्रपती दिसा नायके यांना संसदेचं मजूबत पाठबळ मिळालं आहे. प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या समागी जन बलवेगाया या सजित प्रेमदासा यांच्या पक्षाला ४० जागा मिळाल्या आहेत. माजी अध्यक्ष रानिल विक्रमसिंघे यांच्या न्यू डेमॉक्रेटिक फ्रंटला केवळ ५ जागा मिळाल्या आहेत.

**<><><><><>**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या टी ट्वेन्टी क्रिकेट मालिकेतला चौथा आणि शेवटचा सामना आज होत आहे. जोहान्सबर्गच्या वांडरर्स स्टेडियमवर, थोड्याच वेळीत, म्हणजे साडे आठ वाजता हा सामना सुरु होईल. भारतानं नाणेफेक जिंकून भारताचा प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

चार सामन्यांच्या या मालिकेत भारत २-१ ने आघाडीवर आहे.

**<><><><><>**

जगभरातल्या नवोदित चित्रपटकर्मींच्या असामान्य योगदानाची दखल घेण्यासाठी ५५ व्या इफ्फी या आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट महोत्सवात पदार्पणातल्या सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनासाठी पुरस्कार दिला जाणार आहे. १० लाख रूपये रोख, चांदीचा मोर आणि सन्मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. या

श्रेणीसाठी पाच आंतरराष्ट्रीय आणि दोन भारतीय चित्रपटांची निवड करण्यात आली आहे. जिप्सी हा शशि चंद्रकांत खंदारे यांचा मराठी चित्रपट आणि तेलगु लेखक दिग्दर्शक  इमानी व्ही एस नंद किशोर यांचा 35 छिन्ना कथा काडू या चित्रपटांचा त्यात समावेश आहे. गोव्यात पणजी इथं २० ते २८ नोव्हेंबर या कालावधीत इफ्फी महोत्सव होणार आहेत.

**<><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या कोल्हापूर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या भारतीय जनता पक्षाच्या माझा बूथ सर्वात मजबूत या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातल्या १ लाख बूथ प्रमुखांशी नमो ॲपच्या माध्यमातून, तसंच दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधतील. भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली.

काँग्रेस नेते राहुल गांधी आणि प्रियंका गांधी उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. राहुल गांधी उद्या चिमूर आणि धामणगाव रेल्वे इथं प्रचार सभा घेणार आहेत. तर, प्रियंका गांधी उद्या शिर्डी आणि कोल्हापुरात, तसंच परवा गडचिरोली आणि नागपूरमध्ये प्रचारसभा घेतील.

**<><><><>**

राज्यात ज्यांच्याकडे सत्ता आहे त्यांचा अनुभव चांगला नसल्यानं सत्तेत बदल करण्याशिवाय पर्याय नाही, असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी म्हटलं आहे. ते आज कोल्हापूर जिल्ह्यात इचलकरंजी इथं आयोजित प्रचारसभेत बोलत होते. सत्ता बदलण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी करा, असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्षाचा जाहीरनामा आज प्रकाशित केला. जाहिरनाम्याच्या पहिल्या भागात मूलभूत गरजा, दुसऱ्या भागात दळणवळण, वीज, पाणी नियोजन, घनकचरा व्यवस्थापन, पर्यावरण जैवविविधता यांचा समावेश करण्यात आला आहे. तिसऱ्या भागात प्रगतीच्या संधी आणि राज्याचं  कृषी धोरण आणि चौथ्या भागात **मराठी अस्मिता** हा विषय घेण्यात आल्याचं राज ठाकरे यांनी यावेळी सांगितलं.
जाहीरनामा प्रसिद्ध करताना अनेकांनी आम्ही काय करू इतकच दिलं आहे. पण, आमच्या जाहीरनाम्यामध्ये आम्ही काय करू आणि कसं करू या गोष्टी देखील समाविष्ट  केल्या आहेत, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

गेल्या पाच वर्षामध्ये NRC, मॉब लिंचिंग, कायदा सुव्यवस्था या प्रश्नांवर काँग्रेसनं काहीही भूमिका घेतली नाही, असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी आज केला. या सगळ्या प्रश्नांवर आपल्या पक्षाने भूमिका घेतली, असं ते अमरावतीत नांदगावमध्ये झालेल्या प्रचारसभेत म्हणाले.

**//<><><><><>//**